A.S.D. TOPIWALLA HIGH SCHOOL MALVAN
MAJI VIDYARTHI SANGHATANA
Room 1, VH Sangaonkar Dnyanmandir, Topiwalla High School Campus
Malvan 416606 Phone: 9529786781 Email: mvs.ths@gmail.com

कार्यशाळाः अध्ययन अक्षमता जाणीव जागृती

तारीखः 22 एप्रिल 2024

२२ एप्रिल २०२४ रोजी अशिदे टोपीवाला हायस्कूल च्या सेंट्रल हॉलमध्ये सकाळी ९ ते १२ या वेळेत ' अध्ययन अक्षमता जाणीव जागृती सत्र ' घेतले गेले.

शाळेच्या माजी विद्यार्थीनी आसावरी बर्वे/ सुरेखा डोंगरे (1980 SSC batch) यांनी हे सत्र घेतले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. वळंजू यांनी सर्वांचे स्वागत करून सत्राची सुरूवात करून दिली.

बुद्धीमत्ता चांगली असूनही आणि सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध असूनही काही मुले अभ्यासात मागे का पडतात यामागची कारणे शोधून या समस्येवर काय उपाय करता येईल याबद्दल आसावरी बर्वे यांनी दृकश्राव्य माध्यमातून शिक्षकांचे उत्तम मार्गदर्शन केले.

या सत्राला अशिदे टोपीवाला हायस्कूलच्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील ५० शिक्षक उपस्थित होते. सत्र interactive झाले. शिक्षकांनी आपापल्या शंका विचारल्या आणि आसावरी बर्वे यांनी त्या सर्व शंकांचे समाधानकारक निरसन केले.

हे सत्र सृजन प्रतिष्ठान, पुणे आणि टोपीवाला हायस्कूलच्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे घेण्यात आले.

या समस्येवर मात करण्यासाठी मुलांना वेगळ्या पद्धतीने शिकवण्याची गरज असते. ती पद्धत शिकण्यासाठी सर्व शिक्षकांनी विशेष प्रशिक्षण घेण्याची तयारी दर्शवली. टोपिवाला हायस्कूलच्या श्री. बर्वे सरांचे हे सत्र आयोजित करण्यात बहुमोल सहाय्य मिळाले.

Registered under Societies Registration Act 1860(21), No. MAHA-BOM-116/1991/GB-BSD-dt-06-02-1991(F14511)(Mum)